**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः07.12.2024** **वारःशनिवार**

---

1. देशभरात नवीन 85 केंद्रीय विद्यालयं सुरु होणार, महाराष्ट्रातील तीन ठिकाणांचा समावेश, ठाण्यात नवोदय विद्यालयाला मंजुरी
2. विधानसभेच्या हंगामी अध्यक्षपदी भाजपाचे ज्येष्ठ आमदार कालिदास कोळंबकर यांची नियुक्ती; आजपासून विधानसभेचं विशेष अधिवेशन
3. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून आदरांजली
4. ज्येष्ठ नेते, माजी मंत्री मधुकर पिचड यांचं निधन; आज राजूरमध्ये अंत्यसंस्कार आणि
5. बॉर्डर गावस्कर चषक क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारताचा डाव 180 धावांत आटोपला; ऑस्ट्रेलियाची सावध सुरुवात

**केंद्रीय विद्यालय**

केंद्रीय आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीनं देशभरात नागरी तसंच संरक्षण क्षेत्रांतर्गत 85 नवीन केंद्रीय विद्यालयं उघडण्यास मान्यता दिली आहे. यामध्ये महाराष्ट्रात अकोला, पुण्यातील एनडीआरएफ परिसर, सुदुंबरे आणि रत्नागिरीतील नाचणे भागात प्रत्येकी एक अशा तीन विद्यालयांचा समावेश आहे. 85 नवीन केंद्रीय विद्यालयांच्या स्थापनेसाठी एकंदर 5 हजार 872 कोटी रुपये 2025-26 पासून आठ वर्षांच्या कालावधीसाठी तरतूद करण्यात आली आहे. आतापर्यंत 1256 केंद्रीय विद्यालयं कार्यरत आहेत, यामध्ये परदेशात मॉस्को, काठमांडू आणि तेहरानमधील प्रत्येकी एका विद्यालयाचा समावेश आहे आणि साडेतेरा लाखांहून अधिक विद्यार्थी त्यामध्ये शिकत आहेत. या समितीनं नवोदय विद्यालय योजनेअंतर्गत देशभरात 28 नवोदय विद्यालयं स्थापन करण्यासही मान्यता दिली आहे. यात महाराष्ट्रातील ठाणे इथल्या विद्यालयाचा समावेश आहे.

**संसद**

लोकसभेत काल वायू प्रदूषण, अवयव प्रत्यारोपण, क्षयरोग निर्मूलन याविषयीच्या मुद्द्यांना मंत्र्यांनी लेखी उत्तरं दिली. त्यानंतर काँग्रेस पक्षाचे अमेरिकेतले अब्जाधीश गुंतवणूकदार जॉज सोरोस यांच्याशी संबंध असल्याचा आरोप भाजपानं केल्याच्या मुद्द्यावरुन लोकसभेत गदारोळ झाला. त्यामुळे सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यसभेत अध्यक्ष जगदीप धनखड यांनी काँग्रेसचे खासदार अभिषेक मनु सिंघवी यांच्यासाठी आरक्षित आसनाखाली नोटांचं बंडल सापडल्याची माहिती दिल्यानंतर खळबळ उडाली. या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले असून अद्याप कोणीही हे पैसे आपले असल्याचा दावा केलेला नाही असं त्यांनी सांगितलं. त्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोप झाले. सभागृहाच्या कामकाजात कधीही अडथळा आणू नये असा ठराव राज्यसभेत करण्यात यावा अशी शिफारस भाजपाचे जे. पी. नड्डा यांनी केली. या गोंधळानंतर

शून्य प्रहरात झालेल्या चर्चेत शेतकऱ्यांचा सर्व शेतमाल सरकार किमान आधारभूत किमतीला खरेदी करेल असं आश्वासन कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिलं.

**विधानसभा अध्यक्ष**

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून भाजपाचे ज्येष्ठ आमदार कालिदास कोळंबकर यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी मान्यवर उपस्थित होते.

**विधानसभा बैठक**

राज्य विधानसभेची बैठक आज विधानभवनात होणार असल्याची माहिती विधानसभा सचिव जितेंद्र भोळे यांनी दिली आहे. विधान परिषदेची बैठक परवा सोमवारी संध्याकाळी होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**महापरिनिर्वाण दिन**

राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 68 व्या महापरिनिर्वाणदिनी काल त्यांना देशभरातून अभिवादन करण्यात आलं. राष्ट्रउभारणीतलं डॉक्टर आंबेडकरांचं योगदान दर्शवणारे अनेक कार्यक्रम विविध ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी डॉ आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यासह अन्य मान्यवरांनी नवी दिल्लीतल्या प्रेरणा स्थळ या बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकस्थळी पुष्पांजली अर्पण केली. डॉक्टर आंबेडकर सामाजिक न्यायाचा दीपस्तंभ होते. त्यांनी समता आणि मानवतेसाठी दिलेला लढा अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. राज्यातही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं. त्याबाबतचा हा वृत्तांत....

**दादरमधल्या चैत्यभूमीवर राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिवादन केलं. अशोक स्तंभाजवळील भीमज्योतीलाही मान्यवरांनी अभिवादन केलं. बाबासाहेबांनी दिलेल्या भारतीय संविधानाचा आदर ठेवून त्यांचे विचार आणि कार्य पुढं घेऊन जाणं, आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून अस्पृश्यतेचं उच्चाटनं करणं हीच आंबेडकरांना खरी श्रद्धांजली असेल, असं राज्यपाल आदरांजली वाहताना म्हणाले.**

**देशाच्या विविध क्षेत्रांमधल्या नेत्रदीपक प्रगतीचं श्रेय आंबेडकरांनी देशाला दिलेल्या संविधानाला आहे, असं सांगून देश संविधानाच्या मार्गानंच जगातली महाशक्ती बनू शकतो. कोणत्याही धर्मग्रंथापेक्षा महत्त्वाचं भारताचं संविधान असेल हा कृती संकल्प करण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. आंबेडकरांच्या संविधानामुळे देशाची समृद्धी आहे. त्यांच्या विचार, आचारांवर शासनाचा कारभार सुरू आहे असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मानवतेच्या कल्याणाचा मार्ग आंबेडकरांनी जगाला दाखवला. देशाला एकता, बंधुता आणि समतेमध्ये बांधून ठेवण्याची ताकद त्यांच्या विचारात आहे अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आदरांजली वाहिली.**

**चैत्यभूमीवर झालेल्या या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांसह लाखो नागरिक उपस्थित होते. भारतीय प्रजासत्ताक साकारणारा महामानव या लेखक नरेंद्र जाधव यांच्या पुस्तकाचं प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आलं.विधानसभा अध्यक्ष ॲडव्होकेट राहुल नार्वेकर आणि विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी विधानभवनाच्या प्रांगणातील आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार, गुलाबपुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.**

**नागपूरमध्ये दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि समता सैनिक दलानं महापरिनिर्वाण दिनानिमित्त महारक्तदान शिबिराचं आयोजन केलं होतं. पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीनं विशेष व्याख्यानाचं आयोजन करण्यात आलं होतं. भारतीय संविधानाची मूल्यं जाणून ती आचरणात आणणं हीच बाबासाहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल असं कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी यावेळी म्हणाले. रत्नागिरीतल्या आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या आवाहनानुसार अनेकांनी वह्या-पेनं, शैक्षणिक साहित्य अर्पण करून बाबासाहेबांना वैचारिक अभिवादन केलं. धाराशिव इथं राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सामाजिक समरसता मंचानं रक्तदान शिबिर आयोजित केलं होतं. धुळे, बुलडाणा, परभणी, सोलापूर जिल्ह्यातही महामानवाला अभिवादन करण्यात आलं. तसंच रक्तदान शिबीर, रॅली, यासारखे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांसह सुरेखा जोशी पुणे**

**निधन-नाशिक**

राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री, ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचं काल नाशिक इथं निधन झालं. ते 84 वर्षांचे होते. गेल्या 15 ऑक्टोबर रोजी त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना नाशिकच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्या पार्थिवावर आज राजूर या त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात येतील.

मधुकर पिचड अहिल्यानगर जिल्ह्यातल्या अकोले विधानसभा मतदार संघातून 7 वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. राजकारणाची सुरुवात काँग्रेस पक्षातून केल्यानंतर त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. 2019 मध्ये भाजपात प्रवेश केलेल्या पिचड यांनी आपल्या कारकिर्दीत आदिवासी विकास मंत्री, दुग्धव्यवसाय विकास मंत्री, पर्यटन विकास मंत्री तसंच भटके आणि इतर मागासवर्गीय कल्याण मंत्री म्हणून काम केलं होतं.

पिचड यांच्या निधनाने आदिवासी समाजासाठी अहोरात्र झटणारा, कर्मसिद्धांताचा उपासक आपण गमावला आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत. पिचड यांच्या निधनानं, आदिवासी बांधवांच्या, ग्रामीण भागाच्या विकासासाठी कार्यरत असणारं राजकारण, समाजकारण क्षेत्रातलं मार्गदर्शक नेतृत्व हरपलं आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिचड यांना श्रद्धांजली वाहिली. पिचड यांच्या निधनामुळे आदिवासी समाजासाठी लढणारा मोठा नेता गमावल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्याच्या पहिल्या दिवशी काल भारतानं आपल्या पहिल्या डावात 180 धावा केल्या. भारताच्या डावातल्या सर्वात जास्त 42 धावा नितीश रेड्डीनं केल्या. कर्णधार रोहित शर्मा यानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मिशेल स्टार्कच्या गोलंदाजीचा सामना करताना भारताच्या डावाची सुरुवात अडखळतच झाली. मिशेल स्टार्कनं भारताच्या सहा फलंदाजांना बाद केलं. कालचा खेळ संपला तेव्हा यजमान ऑस्ट्रेलियाच्या 1 गडी बाद 86 धावा झाल्या होत्या.

**<u>पाऊस</u>**

लातूरमध्ये काल मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. त्यामुळे अनेक भागात पाणी साचलं होतं. अचानक आलेल्या पावसामुळे काही ठिकाणी रब्बी हंगामातील पिकांचं नुकसान झाल्याचं वृत्त आहे. सातारा जिल्ह्यात कराड, पाटण तालुक्याच्या काही भागातही काल मुसळधार पाऊस पडला.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.